**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

**अधिसूचना**

क्रमांकः २अ/एडीएम/वास्तुशास्त्र अधि./२००८/१७३९
दिनांक : १९.६.२००८

**प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षेबाबतची अधिसूचना**

शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षेबाबत संचालनालयाने क्रमांक २अ/एडीएम/सीईटी/२००८/१५५६, दिनांक १३.५.२००८ व क्रमांक २अ/एडीएम/सीईटी/२००८/१६५८, दिनांक ३१.५.२००८ अन्वये अधिसूचना प्रसिध्द केलेल्या होत्या. त्या अनुषंगाने प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनातर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षा (CET) संदर्भात दाखल केलेल्या I.A.No.2/2008 in SLP(C) No.3964/2008, दिनांक १३.६.२००८ रोजी सुनावणीस आले असता मा.सर्वोच्च न्यायालयाने १० दिवसांच्या आत संबंधितांना शपथपत्र सादर करण्यास सांगितले आहे आणि सदर I.A.उन्हाळी सुटीनंतर लगेच सुनावणीस ठेवावी असे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर **प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षा (CET) संदर्भात सविस्तर अधिसूचना दिनांक १४ जुलै,२००८ नंतर** प्रसिध्द करण्यात येईल याची सर्व प्रवेशोच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ.एस के महाजन)**
**प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**